येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय,पुणे महानगरपालिका
पत्ता-सरगम हॉटेल समोर, गुंजन चौक येरवडा, पुणे ४११००६.
दुरध्वनी क्र.०२०२५५०९१००/९१०८/९१०९
ई.मेल :- yerwada@punecorporation.org
जा.क्र.-9334४ दिनांक:- 99/0८/२०२५

**अपील अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय**
**प्रथम अपील क्रमांक :- २०/२०२५**

प्रती,
**श्री .अविनाश रामचंद्र रिठे**
रिठे हाउस, डावखरे बिल्डींग,जाधव वस्ती
कळसगाव,आळंदी मार्ग,
पुणे ४११०१५.
मो नं :- ९९२१०४९५०९

**अपिलार्थी**

**विरुद्ध**

**जनमाहिती अधिकारी तथा.उप अभियंता**
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

---

## माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपील

**श्री . अविनाश रामचंद्र रिठे** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील), रिठे हाउस, डावखरे बिल्डींग, जाधव वस्ती कळसगाव,आळंदी मार्ग,पुणे ४११०१५. यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेला अपील अर्ज, दि. ०९/०६/२०२५ रोजी येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाला.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील

| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| ३१/०५/२०२४ | ०९/०६/२०२४ | ०८/०७/२०२५ | जा.क्र १९४७ दि.१९/०६/२०२५ | निरंक |

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

| अपील अर्जाचा दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक | अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | अपिलाच्या विलंबबाबत निवेदन दिले आहे का ? |
|---|---|---|---|---|
| १२/०७/२०२५ | १४/०७/२०२५ | ०७/०८/२०२५ | होय | निरंक |

अपिलार्थी यांनी मूळ अर्जात, पुणे मनपा प्र.क्र.२ येथील येरवडा पोस्ट ऑफिस समोर पुरुष –महिलांसाठी प्रसाधनगृह ची सुविधा मिळण्यासाठी मा.उप आयुक्त परिमंडळ क्र.१ यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते.सदर निवेदनावरील कारवाईचा तपशील मागणी केलेली होती .सदर माहिती हेतुपुरस्सर दिली नाही तसेच असे कारण नमूद करून दि. १२/०७/२०२५ रोजी प्रथम अपिल अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे सदरचा प्रथम अपील अर्ज दाखल केला .सदरचा अपील अर्ज या कार्यालयाकडे आ.क्र.४२०१,दि.१४/०७/२०२५ रोजी प्राप्त झाला. सदर प्रथम अपील अर्जावर दि. ०६/००८/२०२५ रोजी गुगल मिटद्वारे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी गुगल मिटद्वारे उपस्थित होते. तसेच श्री. चंद्रसेन नागटिळक ,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय उपस्थित होते.

# विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेसाठी **श्री . अविनाश रामचंद्र रिठे** (अपिलार्थी) यांनी माहिती अधिकारात माहिती मिळणेकामी दाखल केलेला माहितीचा अर्ज मा. उप आयुक्त,परिमंडळ क्र. १ कार्यालयात प्राप्त झाला.तसेच मा. उप आयुक्त,परिमंडळ क्र. १ कार्यालयाकडून जा.क्र. २१५२, दि.०६/०६/२०२५ ने सदरचा मूळ अर्ज येरवडा क्षेत्रीय कार्यालयाकडे आ.क्र. २६२३ ,दि.०९/०६/२०२५ अन्वये प्राप्त झाला होता . सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी , ये.क.धा. क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडून जा.क्र. १८४७ दि. १९/०६/२०२५ ने माहिती देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी मूळ अर्जात मागणी केलेली माहिती हेतुपुरस्सर दिली नाही असे कारण नमूद करून दि. १२/०७/२०२५ रोजी प्रथम अपिल अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे सदरचा प्रथम अपील अर्ज दाखल केला.

प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी आपले म्हणणे सादर केले. अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना इकडील कार्यालयाचे जा.क्र. ७८१९ दि.२५/०२/२०२५ चे पत्र भेटले परंतु अर्जदार यांच्या नावामध्ये त्रुटी होती त्यावर आक्षेप घेतला आहे . तसेच मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती भेटली नाही. श्री.चंद्रसेन नागटिळक, जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी आपले म्हणणे सादर केले की मूळ अर्जात नमूद विषयाच्या अनुषंगाने पत्र पाठविले होते परंतु टंकलेखनात चूक झाली त्याच्या अनुषंगाने भविष्यात अशी त्रुटी होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेणेबाबत सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांना ताकीद देण्यात येईल.

मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सांगितले की सदरचा व्हीआयपी(VIP) रस्ता असल्या कारणाने पथ विभाग .पुणे मनपा यांच्याकडील अभिप्रायाची प्रतीक्षा करीत आहोत. तदनंतर सदर कामासाठीच्या निधीची तरतूद करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

# आदेश

१. सदर अपिलाच्या अनुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत.

(अ) जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सदर विषयाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना चालू असणाऱ्या कार्यवाहीची अद्यावत माहिती १५ दिवसात द्यावी.

(ब) टंकलेखनातील त्रुटींची कटाक्षाने काळजी घेणेबाबत सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांना ताकीद देण्यात यावी.

***<u>सदरचे अपील हे आज रोजी निकाली काढण्यात येत आहे.</u>***

२. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तंरतूद आहे

(अशोक भवारी)
**प्रथम अपील अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत :

१. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता ,ये.क.धा.क्षेत्रीय कार्यालय,पुणे मनपा
२. श्रीमती.माधुरी ठोंबरे ,सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता ये.क.धा.क्षेत्रीय कार्यालय,पुणे मनपा,